## थोडक्यात

### अरविंद जाधव यांना उत्कृष्ट परीक्षा प्रमुख पुरस्कार



**हदगाव । प्रतिनिधी**

शहरातील पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयाचे परीक्षा प्रमुख ए.जी.जाधव यांना उत्कृष्ट परीक्षा प्रमुख म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना नांदेड,परभणी व हिंगोली या जिल्ह्यांतील शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांना हा पुरस्कार दिला जातो.नांदेड येथील खासगी कोणाळे कोचिंग क्लासेस व रेडिओ सिटी,मिडीया हाऊस तर्फे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.संस्थेचे सचिव सुनिल सोनूले उपाध्यक्षा श्रीमती हदगावकर मॅडम यांच्या हस्ते जाधव यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले संचालक शिवाजीराव तावडे,जगदिश कदम मुख्याध्यापक बंडवार सह आदिनी जाधव यांचे अभिनदन केले याप्रसंगी संदिप ढोले, सौ.मनीषा जाधव यांची उपास्थिती होती. कोनाळे कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा.चौगुले,बिराजदार व रेडिओ सिटी चे गजानन जाधव यांचे शाळेच्या वतिने देशमुख यांनी आभार मानले.

### ऊसतोड कामगारांच्या प्रश्नासाठी २४ सप्टेंबर रोजी पुणे साखर आयुक्त कार्यालयावर मोर्चा : मोहन जाधव

**बीड । प्रतिनिधी**



लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची प्रभावी अंमलबजावणी करा या प्रमुख मागणीसाठी आज २४ सप्टेंबर रोजी पुणे साखर आयुक्त कार्यालयावर महाराष्ट्र ऊस तोडणी व वाहतूक कामगार संघटनेच्या वतीने डॉ.डी.एल. कराड, सुभाष जाधव यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती मोहन जाधव यांनी दिली. महामंडळाची प्रभावी अंमलबजावणी व ऊसतोड कामगारांची नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देणे, वाहतूकदार, मुकादम यांचे कारखान्याकडे राहिलेले थकीत पैसे त्वरित देण्यात यावे, विमा, रेशन, कामगारांच्या पाल्यासाठी वस्तीग्रह, शिष्यवृत्ती, महिलांच्या आरोग्याचे प्रश्न आणि स्थानिक पातळीवरील त्यांच्या समस्यांचे निराकर हंगाम सुरू होण्यापूर्वी करण्यात यावे साठी २४ सप्टेंबर रोजी पुणे साखर आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात जास्तीत जास्त कामगारांनी सहभागी होण्याचे आवाहन सीटू महाराष्ट्र ऊसतोडणी व वाहतूक कामगार संघटनेचे दत्ता डाके, मोहन जाधव, अशोक राठोड, मधुकर आडागळे, संतोष जाधव, राजू ईबीते, रवी राठोड, विजय राठोड, मनिषा करपे, बालासाहेब चोले, ज्ञानेश्वर जाधव, अंगद खरात यांनी केले आहे.

### शेतीपंपांचे सरसकट वीजबिल माफ करा ; स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी

**सातारा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने साडे सात अश्वशक्तीपर्यंतच्या शेतीपंपाचे वीजबील माफ केलेले आहे. यामुळे सुमारे ४५ लाख शेतकऱ्यांना फायदा झाला आहे. पण, साडे सात अश्वशक्तीच्यावर शेतीपंप असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या एकदम कमी आहे. त्यामुळे त्यांनाही न्याय द्यावा. त्यांची चिंता दूर करावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने करण्यात आलेली आहे. संघटनेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, स्वाभिमानी शेतकरी संघटना शेतीपंपाचे बेकायदेशीर विजबिल माफ करावे म्हणून महाराष्ट्रभर आंदोलने करत होती. त्यामुळे शासनाच्या लक्षात ही गंभीर बाब आली. त्यानंतर विजबिल माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. याबद्दल राज्य शासनाचे अभिनंदन. परंतु ही योजना अर्धवट केल्याने राज्यातील साडे तीन लाखांहून अधिक शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत. यातील सर्वाधिक शेतकरी संख्या पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील आहे. याचे कारण येथील भाग डोंगरदर्यांनी जास्त व्यापलाय. त्यामुळेच येथील शेतकऱ्यांना जास्त उंचीवरील शेतीसाठी पाईपलाईन करूनच पाणी न्यावे लागते. तसेच नदी, धरणांचेही प्रमाण जास्त आहे. त्यामुळे दूरच्या पल्ल्यावर पाईपलाईन करून पाणी न्यावे लागत असल्याने जास्त क्षमतेच्या विद्युत मोटारी आहेत. याबाबत त्वरित विचार करून साडेसात अश्वशक्तीवरील सर्व शेतकऱ्यांना योजनेत सहभागी करून घ्यावे. अन्यथा संघटना शेतकऱ्यांना बरोबर घेऊन निर्णय होईपर्यंत आंदोलन करेल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष राजू शेळके यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. राज्य कार्यकारिणी सदस्य अर्जूनभाऊ साळुंखे, वाहतूक संघ अध्यक्ष मनोहर येवले, सातारा तालुकाध्यक्ष रमेश पिसाळ, राजू घाडगे, उमेश घाडगे, मिलींद चव्हाण, जनार्दन आवारे आदी उपस्थित होते.

# माजलगावात धनगर समाजाचा एसटी आरक्षणासाठी दोन तास रस्ता रोको आंदोलन

## ट्राफिक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाला लागले दोन तास ; माजी आमदार होके आडसकर जगताप नाईकनवरे यादव यांनी दिला पाठिंबा

**माजलगाव । प्रतिनिधी**




गेल्या अनेक वर्षापासून धनगर समाजाची एसटी आरक्षणाची मागणी राज्यकर्त्यांच्या उदासीन धोरणामुळे प्रलंबित आहे या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी माजलगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने परभणी फाटा येथे दिनांक २३ सप्टेंबर रोजी तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या रोडवरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाला तब्बल दोन लागले .

धनगर जमातीस एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी पंढरपुर ,लातुर,येथे दि.९ सप्टेंबर पासून राज्यव्यापी आमरण उपोषण सुरू आहेत या आंदोलनास पाठिंबा म्हणून दि. २३ सप्टेंबर रोजी सबंध महाराष्ट्रात रास्ता रोको आंदोलन करण्याचे हाक समाजाच्या वतीने देण्यात आली होती म्हणून त्या हाकेला ओ म्हणून माजलगाव तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने परभणी फाटा चौकत दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १वाजेपर्यंत तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या आंदोलनात सहभागी होऊन माजीआ. राधाकृष्ण होके पाटील, रमेशराव आडसकर, नितीनराव नाईकनवरे, राहुल जगताप, शरद यादव, यांनी मनोगत व्यक्त करून जाहीर पाठिंबा दिला आहे.

तर समाजाच्या वतीने डॉ. भगवानराव सरवदे, तुकाराम येवले, विजय धायगुडे , प्रा. प्रकाश गवते, ज्ञानेश्वर सरवदे, अँड संतोष बाबरे,मुक्तीराम आबूज, राम अबुज ,राजा अर्जुन, यांनी मनोगत व्यक्त केली तर सूत्रसंचालन विशाल देवकते यांनी केले या रस्ता रोकोला बबनराव सरवदे अण्णासाहेब वगरे विलास नेमाने,अविनाशराव कांदुरे,सुभाषराव गडदे किसनराव हराळ कल्याणराव गवते प्रभाकर धरपडे ,नारायण सातपुते, डॉ अशोक तिडके, लक्ष्मणराव गायकवाड,कल्याण कसपटे संतोष रासवे यांच्यासह हजारो तरुण वृद्ध याआंदोलनात सहभागी झाले होते

यावेळी महसूल च्या वतीने महामुनी आणि रूपचंद आभारे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले यावेळी पोलीस निरीक्षक बालक कोळी यांनी चोक बंदोबस्त दिला होता

## देगलूर येथे गोर बंजारा तिज महोत्सव उत्साहात

**देगलुर । प्रतिनिधी**



गोर बंजारा समाजातील महिलाचा सर्वात मोठा सण/उत्सव म्हणजे तीज मानला जातो. या उत्सवामध्ये एका छोट्या टोपली मध्ये धान उगवले जाते आणि त्या धान चे सलग आठ दिवस पुजा केली जाते व नवव्या दिवशी त्याचे पाण्यात विसर्जन केले जाते. धान म्हणजे बंजारा समाजाची देवी अशी धारणा समाजाची आसते.

देगलूर येथील सद्गुरु सेवालाल महाराज चौक पासून ते विसर्जन घाट पर्यंत ही शोभा यात्रा म्हणजेच महोत्सव साजरा करण्यात आला असून या महोत्सवामध्ये बंजारा पारंपारिक लोकनृत्य ,बंजारा पारंपारिक लेंगी , बंजारा हलगी (डपडा), बंजारा पारंपारिक संगीत यांच्यासह इत्यादी पारंपारिक लोक कले सह कुमरिकेच्या डोक्यावर तिज ची टोपली घेऊन वाजत ,गाजत,नाचत ही शोभायात्रा हजारो समाज बांधवांच्या उपस्थीत पार पडली.

यावेळी माजी समाज कल्याण सभापती रामराव नाईक, बंजारा क्रांती दलाचे अध्यक्ष देविदास राठोड, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार , माजी सनदी अधिकारी शिवाजी पवार, माजी सनदी अधिकारी वरवंटकर, माजी अप्पर बी एम कांबळे, पांडुरंग पवार अँड मोहाने मॅडम , भावना दाशेटवार,आजी माजी नगसेवक , विविध संघटनेचे पदाधिकारी विशेष म्हणजे जिजाऊ ब्रिगेड तसेच वेगवेगळ्या तांड्यातील नायक-कारभारी आदी अनेक मान्यवरांच्या उस्थितीत हा कार्यक्रम पडला. देगलूर शहरातील जे बंजारा समाजाचं वैभव (चौक)उभ आहे त्यामधे माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांचे खुप मोठे योगदान आहे असे संयोजक विशाल पवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

या शोभा यात्रे दरम्यान सुशीलकुमार देगलूरकर यांनी फळ वाटप केले. तसेच माजी नगराध्यक्ष मोगलाजी अण्णा शिरशेटवार मित्र मंडळाच्या वतीने विसर्जन घाट येथे जेवण ठेवण्यात आले होते.तसेच नदीच्या पाण्यात तिज विसर्जन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमासाठी संदीप चव्हाण,सचिन जाधव, अनिल राठोड, बालाजी जाधव, कपिल, गणेश,राजु, सचिन यांच्यासह अनेक गोर युवकांनी अहोरात्र मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला त्याबद्दल संयोजकांच्या वतीने सर्व टीम आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राज पवार, डॉ सुनील जाधव यांनी केले तर तिज चे महत्त्व विजय जाधव , प्रस्ताविक संयोजक विशाल पवार तर आभार तानाजी चव्हाण यांनी मांडले.

## अनेक भागात अघोषित भारनियमन; महावितरणचे फोन बंद

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**



मागील तीन ते चार दिवसांपासून शहरातील काही भागात अघोषित भारनियमन सुरू आहे. दाद मागण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांना फोन लावले तर ते फोन उचलत नाहीत. सर्वसामान्यांचे कोण ऐकणार ?

नेमकी सायंकाळी वीज गुल होत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

**सलग तीन दिवसांपासून सायंकाळी वीज गुल**

शहरातील रोशन गेट, किराडपुरा, बारी कॉलनी, रहमानिया कॉलनी, रहिमनगर या भागात गुरुवार, शुक्रवार व शनिवारी सलग तीन दिवस सायंकाळी ६:३० ते रात्री ८ वाजेदरम्यान विद्युतपुरवठा खंडित होत आहे. त्याचा येथील व्यवसायावर मोठा परिणाम होत आहे. यामुळे व्यापाऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. याशिवाय सातारा परिसर, देवळाई परिसर, जाधववाडी, चिकलठाणा, छावणी, हिमायतबाग, बायजीपुरा, हर्सूल शहरातील काही भागात अघोषित भारनियमन सुरू आहे. विद्युतपुरवठा कधी खंडित होईल याचा नेम नाही.

महावितरणची सेवाही अत्यावश्यक सेवेत येते. यामुळे अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना २४ तास अलर्ट मोडवर रहावे लागते. विद्युतपुरवठा खंडित होतो त्याचवेळी नागरिक फोन करीत असतात. जेव्हा फ्यूज कॉल सेंटरमध्ये कोणी फोन उचलत नाही त्यावेळेस नागरिक अधिकाऱ्यांना फोन लावतात; पण अधिकारी फोन उचलत नाहीत. मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांना फोन लावला असता त्यांनी तो कॉल उचलला नाही.

**भारनियमनाची आधी सूचना देणे आवश्यक**

विजेची मागणी वाढल्यावर व त्या तुलनेत पुरवठा कमी असल्यावर भारनियमन केले जाते; मात्र महावितरणची जबाबदारी आहे की त्यांनी भारनियमन करण्याआधी ग्राहकांना सूचना देणे आवश्यक आहे; पण महावितरण आपली जबाबदारी पार पाडत नसल्याचे दिसून आले आहे. शहरात शक्यतो भारनियमन करू नाही. भारनियमनाआधी सूचना देणे व सायंकाळी भारनियमन न करता दुपारी किंवा सकाळी करावे.

# सकारात्मक विचार शिक्षण क्षेत्र प्रवाही ठेवतात : डॉ. वासुदेव मुळाटे

## रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या वतीने रोटरी राष्ट्र शिल्पकार पुरस्कार सोहळा संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**



सकारात्मक विचार हेच शिक्षणाचे प्रवाही रूप टिकविणार , शिक्षकाची जागा कुणीच घेवु शकत नाही , अलिकडे सामाजिक चळवळी तुन सत्य बाजुला गेले आहे अशी खंत ही प्रसिद्ध साहित्यिक डॉ. वासुदेव मुळाटे यांनी व्यक्त केले.

दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी सर्वपल्ली राधाकृणांनं यांच्या जयंती निमित्त रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने रोटरी राष्ट्र शिल्पकार पुरस्कार सोहळा २०२४ वैष्णवी मंगल कार्यालय येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्ष रोटरी क्लब चे विद्यमान अध्यक्ष तथा श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ड.रवींद्र कानडे व कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थिती मध्ये रोटरी क्लब डिस्ट्रिक्ट सहा.प्रांतपाल श्री विवेक गंगणे हे होते..

लता जोशी , स्मिता कानडे , सुरेखा गवळी , प्रभाकर साळेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय मनोगतात रविंद् कानडे म्हणाले शिक्षक वर्ग हा राष्ट्राचा कना असतो व समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करतो व तो समाजातील महत्वपूर्ण घटक आहे त्यामुळे आदर्श शिक्षक यांचा यथोचित सन्मान होणे आवश्यक असून रोटरी क्लब माजलगावच्या वतीने दरवर्षी नियमित सदरील पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते.

**शिक्षकांचा झाला सन्मान-**

पुरस्कृत शिक्षकांमध्ये श्री भारत राऊत (हरकी निमगाव ),श्री बालाप्रसाद चव्हाण (सुलतानपूर) श्री सोमेश्वर मोरे (रेणापूरी)श्री नंदकुमार शिंदे (माजलगाव ) श्री नागनाथ पडलवार (माजलगाव)श्री राधाकिसन चव्हाण (मनुरवाडी)श्री गणेश राठोड (माजलगाव) श्री चंद्रमणी डोंगरे (माजलगाव)श्रीमती जयश्री देशमुख (माजलगाव) श्रीमती पंचशीला फुलोरे ( की. आडगाव ) श्रीमती भाग्यश्री पत्की (माजलगाव )

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाकर साळेगावकर यांनी काम पाहिले तर सूत्र संचालन अँड.दीपक देशमुख व डॉ. सुशीलभय्या लोढा यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रोटरी क्लब च्या विद्यमान सचिव सौ. लता जोशी यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब च्या सर्व सदस्यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले.

सदरील कार्यक्रमाकरिता माजलगाव परिसरातील , सामाजिक,राजकीय,शिक्षक वर्ग,व्यापारी वर्ग, पत्रकार बांधव व परिसरातील शेकडोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# जगायचं राहून गेलं नाही पाहिजे...

क्षणभंगुर जीवनामध्ये किती दिवस आहोत आणि कधी विकेट जाईल याची काहीच खबर नाही कोणालाच. आयुष्य जात रुसण्या फुगण्यात, अबोला पकडण्यात बऱ्याच वेळा आधी कोणी बोलाव यातही वर्ष निघून जातात. जीवनाच्या सर्विस मध्ये कोणीच परमनंट नाही मित्रांनो. आज आहे तर उद्या नाही, शेवटी फक्त फोटो रुपी आठवणीच राहतात.जगून घ्या, बोलून घ्या, मन मुराद हसून घ्या, आलंच रडायला तर रडून ही घ्या, रुसल असेल कोणी तर स्वतः बोलून सुरुवात करून पहा. प्रत्येक क्षण जगता आला पाहिजे. वय नोकरी व्यवसाय प्रतिष्ठा जात पात धर्म या पलीकडे जाऊन जगता आलं पाहिजे. नाचायची इच्छा असेल तर नाचून घ्या , लहानपणी वाटत मोठ व्हावं, मोठेपणी वाटत श्रीमंत व्हावं, आणि म्हातारपणी वाटत परत लहान व्हावं, या सगळ्या चक्रविवाहात जगायचं मात्र राहून जातं. ज्याला जे आवडतं त्यासाठी स्वतः वेळ काढावा. खूप कमवून तरी कुठ घेऊन जायचं आहे . आणि समजा कमवलं तर पुढच्या पिढीला ही टिकवता आलं पाहिजे. यावर ही आपला अभ्यास हवा . आज मन मारून जगाल ही पण तुमच्या मनाच काय ? पैसे नक्कीच कमवा पण स्वतःसाठीही थोडं जगा मित्रांनो. खूप काही कमाल ही पण स्वतःचे छंद स्वतःची आवड स्वतःच्या इच्छा , जत राहिल्या असतील तर ,मात्र सर्व काही कमावून ही आपण कफल्लक आहोत, म्हणून मित्रांनो जगायचं राहून नाही गेलं पाहिजे असं जगा.

मित्रांनो मी पांडुरंग शिंदे मी माझ्या जीवनामध्ये सहज विचार अनुभवला आणले व तुमच्यापर्यंत पोहोचवण्याकरता लिहित आहे.. मी एक वारकरी संप्रदायाचा पाईक आहे पांडुरंगाचा भक्त सद्गुरु गुरुनाम गुरु बंकट स्वामी महाराजांचा सेवक आहे, व संत विचाराचा एक विद्यार्थी आहे....

समय से पहले, और भाग्य से ज्यादा , किसी को कुछ नही मिलता..



**- पांडुरंग महाराज शिंदे ,**
**( श्री गुरु बंकटस्वामी संस्थान निनगुर )**

# मेंदू आणि मानवी जीवन



मानव प्राणी पृथ्वीवर जन्माला आल्यापासून ते आजतागायतच्या प्रवासात मानवी मेंदूला अतिशय महत्व प्राप्त झालेले आहे. मानवाचा विकास झाला म्हणून मेंदूचा विकास झाला. किंवा, मेंदूचा विकास झाला म्हणून मानवाचा विकास झाला? या प्रश्नाचे उत्तर आज जगात कोणाकडेच नाही. परंतु मानवाच्या विकासात मानवी मेंदूच्या विकासाला मात्र अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. मित्रहो आपल्याला चांगले जीवन जगण्यासाठी आपल्या शरीराच्या सर्व अवयवांचे महत्व अवर्णनीय आहे. हृदय, फुप्फुसे, अन्ननलिका, लिवर, किडनी, अंतर्स्राव ग्रंथी हे अवयव अचूक काम करतात म्हणून आपण जिवंत राहतो. परंतु तुम्हाला माहिती आहे का? शरीरातील वरील सर्व अवयवांना मेंदूच चालवत असतो. आपल्या हृदयाची धडधड, फुप्फुसांचे कंप, डोळ्याच्या बुबळाची हालचाल, शरीराच्या सर्व अवयवांची हालचाल मेंदूच नियंत्रित करीत असतो.

आपण चांगल्या आरोग्यासाठी चांगला सकस आहार, शरीर काटक बनविण्यासाठी व्यायाम करीत असतो. जर वजन वाढले तर वजन कमी करण्यासाठी धावणे, उडया मारणे, फॅट विरहित आहार असे सुरूच असते. परंतु हे सर्व शरीराच्या दिसणाऱ्या किंवा जाणवणाऱ्या भागावर आपण काम करीत असतो. पण मेंदूचे काय? आपल्या मानसिकतेचा परिणाम आपल्या मेंदूवर पडतो. विविध मानसिक अवस्थेतून आपल्या मेंदूतून स्त्रावणारी रसायने, या रसायनाचा शारीरिक व मानसिक आजार यावर पडणारे परिणाम याबाबत पूर्ण माहिती असली पाहिजे.

आपण आजारी पडलो की, डॉक्टर आपले रक्त, युरीन तपासतात. या रिपोर्टमध्ये काय असते हे कोणी पाहिलेले आहे का? आपल्या रक्तातील कोणती रसायने वाढली आणि कोणती रसायने कमी झाली हेच असते., आपल्या मानसिकतेमुळे मेंदूच्या काम करण्याच्या पद्धतीत बदल झाला की, पियुशी व इतर ग्रंथीच्या काम करण्याच्या पद्धतीवर परिणाम पडतो, त्यामुळे आपला हार्मोन्सचे संतुलन बिघडते. इतकेच नव्हे तर साधी ताप येणे, बॉडीपेन, शारीरिक थकवा यासारख्या साध्या आजारापासून ते लि, शुगर, थायरॉइड, अस्थमा, पॅरालीसेस, हार्ट अटॅक यासरखे दुर्धर आजार सुद्धा आपल्या मेंदूच्या काम करण्याच्या पद्धतीतील बिघाड झाल्यामुळे उद्भवतात. मेंदूतील व शरीरातील ग्रंथीमधून जी रसायने स्त्रावत असतात त्यांच्यात बिघाड होऊन बहुतांश आजार सुरु झालेले असतात. ताणतणावाचे व्यवस्थापन, भावनिक गुंता सोडवणूक, धाडस, आत्मविश्वास, आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य, बौद्धिक क्षमता, आपल्या विविध क्षमता या आपल्या पियुशी ग्रंथीतून कोणते हार्मोन्स स्त्रावतात, यावर अवलंबून असते.





जनसामान्यांचे शस्त्र, दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि.२४ सप्टेंबर २०२४ ● पान ४





# बीड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे यांचे नाव

## बीड आयटीआय ला लोकनेते विनायकराव मेटे यांचे नाव; राज्यमंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

मंत्रालयात आज पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील विविध जिल्ह्यात असलेल्या १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे आयटीआय यांचे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार या महाविद्यालयांना महापुरुषांचे व संबंधित जिल्ह्यात योगदान दिलेल्या व्यक्तींचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने १४ आयटीआय यांचे नामकरण करुन १४ महान व्यक्तींची नावेदेखील या आयटीआय संस्थेसाठी देऊ केली आहेत. यामध्ये बीडमधील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे नाव देण्यात आले आहे.



लोकनेते विनायकराव मेटे यांनी आपल्या हयातीमध्ये विद्यार्थ्यांसाठी अनेक लढे उभे केले. बीड मधील शासकीय आयटीआय महाविद्यालयाला नेहमीच त्यांनी सहकार्याची भूमिका ठेवली होती या ठिकाणी असलेल्या वस्तीगृहाचे नूतनीकरण, पिण्याचे पाण्याची व्यवस्था याबरोबरच अनेक समस्या सोडवण्याचे काम त्यांनी केले होते. त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या कार्याला स्मरून आज राज्य सरकारने बीड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामकरण ☛ (उर्वरित पान २ वर)

## थोडक्यात

### शेख राबियाबी पटेल यांचे दुःखद निधन

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्यातील साबलखेड येथील रहिवाशी स्वर्गीय शेख रमजान पटेल यांच्या पत्नी व पत्रकार प्रा.शेख निसार यांच्या आजी शेख रबियाबी रमजान पटेल वय ९८ (साबलखेड) यांचे रविवार दि. २२ सप्टेंबर रोजी सकाळी ६.२० वाजता दुःखद निधन झाले. गेल्या अनेक दिवसापासून त्या आजारी असल्याने त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते . त्या साबलखेड येथील दिवंगत शेख रमजान पटेल यांच्या त्या सुविद्य पत्नी होत्या. तर आष्टी नगरपंचायत चे विद्यमान नगरसेविका शेख शमीम व शेख बाबुमिया सर यांच्या त्या आई होत्या. अत्यंत मनमिळाऊ शांत संयमी असा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्यावर साबलखेड येथील कब्रस्तान मध्ये दफनविधी करण्यात आला. यावेळी पंचक्रोशीतील सर्व नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात चार मुले, चार मुली, सूना, जावई,नातवंडे, असा परिवार आहे.

### राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) पदाधिकार्यांची कार्यकारिणी जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जी संजीवा रेड्डी यांच्या व महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.कैलास भाऊ कदम, महाराष्ट्र उपाध्यक्ष बाबासाहेब चव्हाण यांच्या आदेशावरून बीड जिल्हा शासकीय विश्रामगृह येथे दि. १९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता बैठक घेण्यात आली. या बैठकी मध्ये संघटित व संघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळावा या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते यांची राष्ट्रीय मजदूर काँग्रेस इंटक बीड जिल्ह्याच्या पदाधिकार्यांची निवड करुन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. बीड जिल्हा काँग्रेस (इंटक) कार्यकारिणी पुढील प्रमाणे - उपजिल्हाध्यक्ष -संदीप भाऊसाहेब झिंजुर्के , सचिव- सखाराम काशिनाथ बेगंडे, सहसचिव -मधुसूदन मोहन मस्के, कोषाध्यक्ष -अशोक सखाराम धुमक, संघटक- वैजनाथ किसन बर्डे, सदस्य- महादेव गणपत कुरवडे, सदस्य- दयानंद काशिनाथ धुरंदरे, सदस्य- मारुती सूर्यभान आगाव, सदस्य- किशोर ज्ञानोबा यादव इत्यादी पदाधिकार्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

### ईद- ए मिलादुन्नबी निमित्त बीड बार्शी नाका येथून सर्व धर्मीय मिरवणूक व अन्नदान कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

ईद-ए-मिलाद म्हणजे जगात शांती त्यागाचा आणि माणुसकीचा संदेश देणारे मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिवस यानिमित्ताने साजरा करण्यात येतो.तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मनसुरी अन्सार अहमद निसार अहमद यांच्याकडून बीड शहरातील बार्शी नाका भागातून भव्य सर्व धर्मीय मिरवणूक व अन्नदान कार्यक्रम करण्यात आले. पैगंबर जयंती (ईद-ए-मिलाद) या दिवशी मोठ्या उत्साहात मिरवणूक (जुलूस) काढतात. तसेच जगभरातील मुस्लिम बांधवांचा पवित्र ईद-ए-मिलादुन्नबी हा सण व हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे.ईद-ए-मिलाद म्हणजे हजरत मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिवस.यानिमित्त शहरातील मशिदीवर , मोहल्यात गेल्या आठवड्यापासून भव्य रोषणाई करण्यात आली होती. याठिकाणी पवित्र धार्मिक ग्रंथाचे पठण करून ईदनिमित्त पवित्र पर्व काळात पहाटे पाच ते रात्री दहापर्यंत मुस्लिम भाविक मोठ्या संख्येने बयान ऐकण्यासाठी गर्दी करतात.दरम्यान ईद निमित्त वेज बिर्यानी भात,दुध शरबत प्रसाद म्हणून वाटप केला जातो. बार्शी नाका येथुन निघुन हजरत शहेनशाह वली रहें. दर्गाह पर्यंत मिरवणुक काढण्यात आली यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन जिल्हाधिकारी कार्यालय अल्पसंख्याक विभाग च्या वतीने उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी साहेब,के.जी.एन जहीर शहा कादरी साहाब युवा नेते अखिल भैय्या ईनाम दार,ॲड.रईस पठान,ॲड.पिंजारी मोसिन अहमद, ईरफान कुरेशी, वसीम कादरी, मोमीन नाहेद,हाफिज कारी सहाब, मोहसीन ईनामदार ,सलीम पेंटर, वाजेद ईनामदार व सर्व धर्मीय जनसमुदाय बहुसंखेने उपस्थित होते.सदरील ईद-ए मिलादुन्नबी निमित्त बीड बार्शी नाका येथून सर्व धर्मीय मिरवणूक व अन्नदान कार्यक्रम सामाजिक सलोखा निमित्त जिल्हाधिकारी कार्यलय च्या वतीने उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी साहेब यांनी सर्व समाज बांधवांना शुभेच्छा दिले व सामाजिक उपक्रमा बद्दल कौतुक केले.

## मुख्यमंत्री साहेब, विद्युत सहाय्यक पदाच्या परीक्षा कधी घेणार परीक्षार्थी चा आर्तटाहो

**माजलगाव । प्रतिनिधी**

आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) अंतर्गत गेल्या अनेक वर्षापासून पदविकाधारक विद्यार्थ्यांनी माजलगाव तालुका सह बीड जिल्ह्यातील व या महाराष्ट्र राज्यामध्ये महापारेषण व महावितरण मंडळामध्ये विद्युत सहाय्यक या पदासाठी गेल्या एक वर्षापासून परीक्षेसाठी फॉर्म भरलेले आहेत व त्याची फीस सुद्धा आय.टी. आय. पदविकाधारक विद्युत सहाय्यक पदासाठीच्या बेरोजगार तरुणांनी, तरुणींनी भरलेले आहेत परंतु गेल्या लोकसभेचे आचारसंहिता लागली व सत्ताधाऱ्यांना फक्त आपण व आपला पक्ष निवडून कसे येतील याचीच सत्ताधारी महायुती भाजप, शिंदे शिवसेना व अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस गट स्वप्न बघत होते त्या लोकसभेच्या निवडणुका पुढे त्यांना महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगार विविध पदव्या व पदविका प्राप्त केलेले बेरोजगार तरुण यांच्या हाताला काम द्यावे त्यांना नोकरी द्याव्यात याचं कोणतेही भान राहिलं नव्हतं फक्त आणि फक्त खुर्चीचीच स्वप्न त्यांना दिसत होती म्हणून लोकसभेच्या आचारसंहिता लागल्यामुळे महापारेषण व महावितरण मध्ये विद्युत सहाय्यक या पदासाठी लाखो विद्यार्थ्यांनी भरलेले फॉर्म व त्याची क्लासेस लावून लाखो रुपये खर्च करून मोठ्या मोठ्या सिटी मध्ये त्याचा सराव केलेला होता व अहोरात्र अभ्यास करून कष्ट,मेहनत घेतली होती परंतु या महाराष्ट्र सरकारने त्या विद्यार्थ्यांची केलेल्या कार्याची कष्टाची मेहनतीची जाणीव न ठेवता परीक्षा घेतल्याच नाहीत व पुन्हा डबल त्याच परीक्षेची जाहिरात काढून पुन्हा फॉर्म भरून घेतले पुन्हा विद्यार्थी सरकारच्या निर्णयाकडे डोळे लावून आस लावून बघत आहेत की

☛ (उर्वरित पान २ वर)

## अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून भरपाई द्या

### आ.संदीप क्षीरसागरांची शासन, प्रशासनाकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड मतदारसंघातील बीड व शिरूर का. तालुक्यात मागील दोन दिवसात अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे शेतातील पिकांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानींचे तात्काळ पंचनामे करून शेतकर्यांना नुकसान भरपाई द्या अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासन आणि प्रशासनाकडे केली आहे. बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड तालुका आणि शिरूर का. तालुक्यात जवळपास सर्वच महसूल मंडळात दि.२२ सप्टेंबर व दि.२३ सप्टेंबर रोजी सलग ☛ (उर्वरित पान २ वर)



**७२ तासांच्या आत पवर नुकसानीची तक्रार करा: आ.संदीप क्षीरसागर – नियमानुसार, पिकांच्या संबंधित नुकसानीची माहिती क्रॉप इन्शुरन्स पवर ७२ तासांच्या आत दाखल करणे अनिवार्य आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी लवकरात लवकर क्रॉप इन्शुरन्स पवर आपल्या शेतातील पिकांच्या नुकसानीची माहिती दाखल करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे**

## सिद्राम सोळंके यांची मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेचा सचिव (UR) म्हणून सर्वानुमते निवड




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारताची लोकशाही अतिशय समृद्ध असून विद्यार्थ्यांना याची जाणीव व्हावी म्हणून महाविद्यालयीन निवडणुका घेतल्या जातात. मतदानाद्वारे लोकप्रतिनिधी निवडण्याचा आपल्याला अधिकार आहे.

लोकशाहीमध्ये मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे. या गोष्टींची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, त्यांनी निवडणूक प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी व्हावे. यासाठी निवडणूका घेण्यात येतात. मात्र आज अंबाजोगाई येथील मानवलोक समाज कार्य महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी निवडायचे होते. यामध्ये सर्वानुमते सिद्राम सोळंके यांची विद्यार्थी परिषदेच्या सचिव पदी बिनविरोध निवड करण्यात आली. त्याचबरोबर कृष्णा शिंदे,भाग्यश्री कराड, सायली निशिगंध,पल्लवी काळे, बालाजी किर्दन्त, नितीन गोरे, समीर शेख, या विद्यार्थ्यांची विविध विभागाचे प्रतिनिधि म्हणून निवड करण्यात आली. निवड झालेल्या प्रतिनिधींची मानवलोकचे कार्यवाहक अनिकेत लोहिया,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव,डॉ.हनुमंत साळुंखे व इतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## कर्मचारी पतसंस्था कर्मचार्यांसाठी मोठा आधार : डॉ.योगेश क्षीरसागर

### बीडमध्ये नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेतचे कार्य उत्कृष्ट असून यामुळे कर्मचार्यांना हक्काचा आधार ठरलेली आहे. यात वाढ करत संस्थेने कर्मचार्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात करावी, असे मत संस्थेचे सहसचिव तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले.



बीड शहरातील नवगण, विनायक शिक्षण संस्थेची नवगण, विनायक कर्मचारी सहकारी पतसंस्थेची २७ वी सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२२) सकाळी ११:३० वाजता शहरातील के. एस.के येथील स्पोर्ट्स सभागृहात पार पडली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी माजी ☛ (उर्वरित पान २ वर)

## पोस्टर पेंटिंग स्पर्धेत तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनची पुनम बातरा द्वितीय

### एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ मुंबई आयोजित युवा महोत्सवात तुलसीची भरारी

**बीड । प्रतिनिधी**

एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ मुंबई आयोजित युवा महोत्सवात तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीडच्या विद्यार्थिनीने भरारी घेत पोस्टर पेंटिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला आहे. याबद्दल देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप.रोडे यांनी विजेता विद्यार्थिनी पूनम पातरा हिचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मुंबई येथील शहा म हाविद्यालय माटुंगा येथे दि.२१ स्पटेंबर रोजी एस.एन.डी.टी.म हिला युवा महोत्सव पार पडला. या युवा महोत्सवात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील फॅशन डिझाईन कॉलेजच्या विद्यार्थिनीने सहभाग नोंदविला होता. यामध्ये युवा महोत्सवात डान्स स्पर्धा, पोस्टर



पेंटिंग स्पर्धा, निबंध स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा आदींचा समावेश होता. यातील पोस्टर पेंटिंग स्पर्धेत तुलसी ☛ (उर्वरित पान २ वर)

## विकास कामे व जनतेच्या विश्वासावर निवडणूकीला सामोरे जाणार : आ. बाळासाहेब आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**

पाच वर्षांमध्ये मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली असून २० -२० वर्ष आमदार राहिलेल्या पेक्षा पाच वर्षात जास्त विकास निधी खेचून आणला आहे. प्रत्येक गावामध्ये विकास कामे दर्जेदार केले आहेत येणाऱ्या निवडणुकीत विकास कामाच्या जोरावर व जनतेच्या विश्वासावर निवडणूकीला सामोरे जाणार असल्याचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी हिंगणी येथे बोलतांना सांगितले.

आष्टी तालुक्यातील हिंगणी येथे विविध विकासकामांचे लोकार्पण व उद्घाटन रविवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी आ. बाळासाहेब आजबे यांच्या हस्ते सकाळी नऊ वाजता संपन्न झाले या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष काकासाहेब शिंदे युवा नेते महेश आजबे युवकचे तालुका अध्यक्ष भाऊसाहेब घुले राजेंद्र जरांगे हिंगणीचे सरपंच संभाजी



झांबरे विलास झांबरे, लक्ष्मण ओव्हाळ सदाशिव झांबरे शहाजी झांबरे अनिल झांबरे सार्वजनिक बांधकामचे उपअभियंता सौदागर, शाखा अभियंता बादाडे उपस्थित होते यावेळी हिंगणी येथे चार कोटी ५० लाख रुपये किंमतीच्या कामांचा लोकार्पण व तीन कोटी रुपये किम तीच्या रस्त्याचे उद्घाटन आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी बोलताना पुढे आमदार आजबे म्हणाले की गेल्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये आपण आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात ☛ (उर्वरित पान २ वर)